नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 26/02/2021 (शुक्रवार)
(दुपार)

---

## फसवणुक

पो.स्टे. काटोल :- अंतर्गत 0.5 कि मी अंतरावर तार बाजार काटोल येथे दिनांक 03/06/2018 ते 13/11/2020 चे 18.00वा. दरम्यान फिर्यादी नामे- सौ. ज्योती जगदीश केला, वय 53 वर्ष, रा. तार बाजार काटोल व आरोपी क्र 1) सौ नर्मदा बाबा कुमेरीया, रा. कारला वाढोणा व 2) बाबा कुमेरीया, रा कारला वाढोणा यांची शेती विक्री बाबतचाा करारनामा झाला होता. त्या करारनाम्यातील अटीचे आरोपीतांनी पालन न करता संगणमत करून फिर्यादीने करारनामा करतेवेळी दिलेले 3 लाख रूपये आरोपीतांनी फिर्यादीस परत न करता करारनाम्यातील शेती फिर्यादीस विकत न देता दुसऱ्या व्यक्तीस विक्री करून देवून फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 420, 34 भादंवि. अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि वानखेडे मो क्र 8888110877 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. उमरेड :- अंतर्गत 16 कि मी अंतरावर मौजा मकरधोकडा शिवार उमरेड ते बुटीबोरी रोड दत्त मंदीर टेकळी जवळ येथे दिनांक 25/02/2021 चे 17.30 वा. सुमारास एमएच-40/यु-3195 क्रमांकाचा पॅशन प्रो मोटरयसायकलचा चालक नामे- प्रविण रायभान कुळमेथे, वय 35 वर्ष, रा. मुरादपुर हे मकरधोकडा येथुन मुरादपुर येथे जात होते. तसेच एमएच-40/सी-2880 क्रमांकाची सीटी-100 मोटरसायकलचा चालक नामे- पुंडलिक फकिरा सैय्यद, वय 46 वर्ष, रा. देवळी हे आपले मोटरसायकलवर केशव मनिराम वाढवे(मृतक), वय 70 वर्ष, रा. देवळी यांना डबल सिट बसवुन मकरधोकडा कडुन देवळी कडे जात होते. त्यादरम्यान वरील दोन्ही मोटरयसायकलचे चालक हे मकरधोकडा येथुन मुरादपुर येथे एका मागोमाग एक जात असता बुटीबोरी कडुन मकरधोकडा कडे जाणाऱ्या अज्ञात ट्रक चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन दोन्ही मोटरसायकला आमोरा-सामोर धडक दिली. या अपघातात एमएच-40/सी-2880 क्रमांकाच्या मोटरसायकलचे मागे बसलेले केशव वाढवे यांचे डोक्याला गंभीर मार लागुन त्यांचा जागीच मृत्यु झाला. तर चालक नामे पुंडलिक सैय्यद व प्रविण रायभान कुळमेथे हे दोघेही गंभीर जखमी झाले.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा प्रफुल माहुरे पो. स्टे उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279,337,338,304(अ) भादवि सह कलम 134(अ)(ब),184/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि नितेश डोर्लीकर मो.नं. 9595678239 हे करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 15 कि मी अंतरावर कन्हैयाडोल शिवार येथे दिनांक 19/02/2021 चे 12.00 वा. सुमारास आरोपी/मृतक नामे– प्रदीप शेषराव निंबाळकर, वय 24 वर्श, रा. पारडसिंगा मध्यप्रदेश याने त्याचे ताब्यातील एम.एच–31/बी.एफ–8875 क्रमांकाची मोटरसायकल हयगयीने व निष्काळजीपणे चालविल्याने त्याचा मोटरसायकल वरील नियंत्रण सुटल्याने मोटरसायकल स्लीप झाली व तो खाली पडला. या अपघातात त्याचे डोक्याला व डोळया जवळ मार लागल्याने तो गंभीर जखमी झाला. त्यास प्राथमीक उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय सौंसर व छिंदवाडा येथे नेले असता तेथे उपचार करून पुढील उपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपूर येथे दि. 23/02/2021 रोजी उपराचादरम्यान 11.15 वा. मृत्यु झाला. सदर कागदपत्रे पो.स्टे. सावनेर ला प्राप्त झाल्याने गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा विकास बेलसरे मेडीकल पोलिस बुथ नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279,337,338,304(अ) भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ देवशंकर गुप्ता पोस्टे सावनेर मो.नं. 9923402357 हे करीत आहे.

3) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 15 कि मी अंतरावर मौजा बाजारगाव शिवार अग्रवाल पेपर मिल समोर हायवे रोडवर दिनांक 18/02/2021 चे 19.00 वा. सुमारास जगतपाल रिबु सिंग(मृतक), वय 22 वर्ष, रा. ता. पनकडी जि सुंदरगट ओडीसा ह. मु बाजारगाव हा रोड क्रास करून रोडच्या त्या बाजुला जात असतांना एका अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहान भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन त्यास धडक दिली. या अपघातात जगतपाल सिंग हा गंभीर जखमी झाल्याने त्यास उपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. पो. स्टे. कोंढाळी येथे कागदपत्रावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जाथीया मगरापुरम, वय 30 वर्ष, रा. पक्कुडी जि. सुदरगड ओडीसा, ह.मु. बाजारगाव यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279,304(अ) भादवि सहकलम 134,184,177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक किशोर लोही 9146422633 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर